# भारतीय जनता पक्ष

## राष्ट्रीय परिषदेची बैठक

**2 मार्च-3 मार्च 2013,नवी दिल्ली**

**<u>राजकीय प्रस्ताव</u>**

**<u>बेफाम भ्रष्टाचार ही युपीए ची ओळख</u>**

पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह आणि युपीए अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली युपीए सरकार काही महिन्यात 10 वर्षात प्रवेश करणार आहे. निवडणुकीच्या आधी सरकारचे हे शेवटचे वर्ष असेल. जात असलेला प्रत्येक दिवस या गोष्टीला मजबूत वळण देत आहे की,डॉ.मनमोहन सिंह यांची सरकार स्वातंत्र्यानंतरची सर्वात भ्रष्ट सरकार आहे. ही आघाडीवाली सरकार नसून भ्रष्ट लोकांची आघाडी आहे.

मोठे घोटाळे, आश्चर्यचकित करणारा भ्रष्टाचार, लाचखोरीची उदाहरणे, दलाली आणि मोठी वित्तीय तूट यांसारखे रोजचे अशा भयंकर प्रकारे सारखे-सारखे समोर आले की त्यांची गणना ठेवणे मुश्कील आहे. हे सर्व या कारणास्तव झाले की उच्च स्तरावर साटे-लोटे होते आणि राजकिय नेतृत्वाकडून स्पष्ट रुपात संरक्षण प्राप्त दलालांनी एका पाठोपाठ एक घोटाळे करत जनतेचे लाखो-करोडो रुपये धन लूटत राहीले. अधिकतर प्रकरणात फक्त युपीए सरकारच्या राजकीय नेतृत्वातील महत्त्वपूर्ण व्यक्तींची मिलीभगत तर आहेच परंतु त्यांचा सक्रीय सहभाग देखील आहे. सत्य तर हे आहे की, पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह आणि युपीए अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी प्रत्येक वेळी चुप्पी चे षडयंत्र, अपराधीक उदासिनता आणि पूर्णतः बेरुखीचा परिचय दिला, ते पण यावेळेला जेव्हा देशाची संपत्तीला सगळीकडून लूटले जात होते. एका

पाठोपाठ एक झालेल्या घोटाळ्याने देश अचंबित झाला.

## घोटाळ्यांची मालिका

वास्तविक पाहता या घोटाळ्यांची यादी फार मोठी आहे. दूरसंचार मंत्रालयात टू-जी परवाने वाटपात मोठा भ्रष्टाचार स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात लाजिरवाणी गाथा असेल, ज्यात 1.76 लाख करोड रुपयांच्या मोठ्या रक्कमेचा घोटाळा झाला. एवढे की सर्वोच्च न्यायालयाने परवाने रद्द करण्याचा आदेश दिला आणि आतापर्यंत खटला सुरु आहे. सरकारचा एक जेष्ठ मंत्री अजूनही छाती ठोकून सांगत आहे की यात काहीच खोटे झाले नाही. वित्त मंत्री श्री पी चिदंबरम यांच्या विरोधात पर्याप्त पुरावे असताना, पंतप्रधान सातत्याने वित्त मंत्री श्री पी चिदंबरम यांना क्लीनचीट देत राहीले. या मोठ्या घोटाळ्यात सीबीआयला त्यांच्याविषयी पंतप्रधान कार्यालयाची चौकशी करण्याची परवानगी देण्यात आली नाही. सीबीआय चे वकिल यांचे आरोपी बरोबर मिळाले असल्याच्या निराशाजनक वृत्ताने चौकशी आणि खटल्याच्या निष्पक्षतेबद्दल आणखी शंका उपस्थित झाल्या आहेत.

राष्ट्रकूल खेळ आयोजन घोटाळ्यात श्री सुरेश कलमाडी हे आपल्या अनेक सहयोगींसोबत खटल्याचा सामना करत आहेत पण अंतिम जबाबदारी इथपर्यंतच संपत नाही. सुरेश कलमाडी एकमात्र जबाबदार नसून या घोटाळ्याची पाळेमूळे अत्यंत खोलवर गेली आहेत. प्रत्येक फाईलला कॅबिनेट, कॅबिेनेट उपसमिती, मंत्र्यांचे समूह, व्यय वित्त समिती आणि शेवटी पंतप्रधानांनी परवानगी दिली. शुंगलु समितीला पंतप्रधानांनी स्वतः नियुक्त केली, ज्यांनी श्रीमती शीला दीक्षित यांच्या नेतृत्ववाली सरकारच्या विरोधात गंभीर टिप्पणी केली. समितीने सांगितले की जे काही केले गेले त्याचा काही खास ध्येय होते आणि परियोजनेत अनावश्यक विलंब, कदाचित उच्च स्तरावर जाणून-बुजून करण्यात आलेला प्रयत्न आहे, त्यामुळे दहशत

पसरवून सर्व संबंधित लोकांना अनुचित लाभ पोचवला जाऊ शकेल. हा घोटाळा 70,000 करोड रुपयांचा होता आणि पंतप्रधानांच्या आश्वासना नंतर सीबीआय ने शीला दीक्षित सरकार च्या विरोधात कोणतीच चौकशी केली नाही.

कोलगेट ज्यात 142 कोळसा खाण वाटप करण्यात आले आहेत. कॉंग्रेस नेतृत्वाचे अनेक नातेवाईक आणि नातलगांच्या व्यतिरिक्त त्या लोकांना पण मिळाले ज्यांनी अनुचित आणि मनमानी रित्या कॉंग्रेसचा खजिना भरण्याचा काम केला. यामुळे देशाच्या तिजोरीला 1.86 लाख करोड रुपायाचा फटका बसला. सीबीआयला योग्य प्रकारे चौकशी करण्यासाठी फाईल सुद्धा उपलब्ध केली जात नाही. याचे एकच कारण आहे, हा घोटाळा जेव्हा झाला तेव्हा अधिकतर करुन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांच्याकडे कोळसा खाते होते. त्यामुळे डॉ.मनमोहन सिंह हे या घोटाळ्यासाठी थेट राजकीय आणि नैतिक दृष्ट्या जबाबदार आहेत. आता तर निष्पक्ष चौकशी सुद्धा थांबविण्यात येत आहे.

विदेशी बॅंकेत काळा पैसा (जवळपास 25 लाख करोड रुपये) परत आणण्याची अनिच्छा, देवास-एंट्रिस सौदा (2 लाख करोड रुपये), दिल्ली च्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या खासगीकरणात हजारो करोड रुपयांची किंमती जमिनीचा व्यावसायिक वाटपातील घोटाळा,आदर्श हाउसिंग घोटाळा अशाप्रकारची अनेक प्रकरणे आहेत. भाजपाच्या आक्रमक अभियान आणि मिडीया तसेच न्यायालयांच्या हस्तक्षेपामुळे अधिकतर प्रकरणी चौकशी शक्य झाली. याप्रकरणी सरकारची कोणतीच भूमिका नव्हती कारण सरकारने नेहमीच भ्रष्ट लोकांचा बचाव करण्याचा प्रयत्न केला.

<u>हेलिकॉप्टर खरेदित दलाली- नवीन घोटाळा</u>

असे वाटते की विभिन्न घोटाळ्यात जनतेच्या लाखो-करोडो घोटाळ्याची लूट कमी

होती, अगस्टा वेस्टलँड आणि त्याची प्रमुख इटलीतील कंपनी फिनमेक्कानिका कडून वीआयपी हेलिकॉप्टर खरेदित मोठी लाच आणि दलाली म्हणजे युपीए सरकारच्या लूटीचा नवा अध्याय आहे. जनतेच्या 40,000 करोड रुपयाच्या यो सौद्यावर गेल्या एक वर्षापासून अधिक गंभीर प्रश्नं उचलली जात होती. भाजपाने मागील वर्षी संसदेत हे प्रकरण उठवले होते. इतपत की आयकर विभाग पण चौकशी करणार होते आणि अशाप्रकारे गंभीर आरोप समोर आले की सुमारे 350 करोड रुपयांचे मोठे कमिशन देण्यात आले. भारत सरकारने आतापर्यंत या प्रकरणाची चौकशी केली नाही आणि संरक्षण मंत्र्यांनी संसदेत इतपत सांगितले की यात काहीच गडबड नाही. या पूर्ण सौद्याला युपीए सरकारने अंतिम रुप दिला आहे आणि त्याला पूर्ण केला.

इटलीतील अधिकारी हेलिकॉप्टर देणा-या फिनमेक्कानिका या कंपनीविरोधात भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करत होते आणि शेवटी हेलिकॉप्टर सौद्यात लाच देण्याच्या आरोपाखाली कंपनीचे सीईओ ला सुद्धा अटक करण्यात आली. देशात पुन्हा एकदा हंगामा झाला आणि सरकारला नाईलाजास्तव कारवाई करण्यास भाग पडले. आता सीबीआयने पुष्टी केली आहे की दलालांनी ट्यूनिशिया आणि मॉरिशय मार्गे अनेक भारतीयांना लाच दिली. भारतीय कायद्याच्या अंतर्गत कोणत्याही दलालाची नियुक्ती एक गंभीर अपराध आहे. शस्त्रास्त्र सौद्याप्रकरणी लाच दिल्याबाबत सरकारचा रेकॉर्ड खराब आहे. सर्वांना माहित आहे की, बोफोर्स दलालीत ओत्तावियो क्वात्रोची चे इटलीशी संपर्क असल्याच्या कारणास्तव त्याला वाचवण्यासाठी हरप्रकारे मदत केली गेली.

भाजपा आव्हान देत आहे की, ती हेलिकॉप्टर घोटाळ्याचा तोच प्रकार होऊ देणार नाही. याप्रकरणी काही तथ्य स्पष्ट आहेत. दलाली कोणी दिली सर्वांना माहित आहे, किती दिली हे सुद्धा माहित आहे, फक्त चौकशी करुन हे माहित करण्याची गरज आहे

की, भारतात कोणत्या लोकांना याचा लाभ पोहोचला. स्वाभाविक आहे की घोटाळ्याची इतकी मोठी किंमत पूर्व वायू सेनाध्यक्ष आणि त्यांच्या सहयोगीपर्यंतच सीमित राहिली नसेल. सरकारमध्ये काही प्रभावशाली व्यक्ती आहेत जे याला संरक्षण आणि बढावा देत होते. देशाला पाहिजे आहे की त्यांची नावे सार्वजनिक करावीत आणि त्यांना शिक्षा करावी तसेच सरकारने हे काम लवकरात लवकर करावे. एक वर्षाच्या निष्क्रियतेने सरकारच्या विश्वसनियतेला संपवून टाकले आहे. कोणी ना कोणी अशा व्यक्तीला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे ज्याचा उच्च स्तरावर संपर्क आहे. असे अनेक संदिग्ध बाबी आहेत की ज्यामुळे वाटते की सरकारला निष्पक्ष चौकशी करायची नाही आहे.

संसद (राज्य सभा) मध्ये नुकत्याच झालेल्या युक्तीवादात पुन्हा एकदा स्पष्ट झाले की, सरकार लाच घेणा-यांची ओळख करण्यासाठी गंभीर नाही. मागील एक वर्षापासून अधिक काळ सरकारने याप्रकरणाची चौकशी योग्य प्रकारे सुरु केली नाही. मुद्दा जनतेसमोर आला आहे, इतपत की आयकर विभाग पण दलालांच्या भूमिकेची चौकशी करणार होता. इटलीमध्ये मागील एक वर्षापासून चौकशी सुरु आहे मात्र सरकार अद्याप गप्प बसली आहे. आतापर्यंत सरकारने औपचारिक प्रकारे कोणतेच स्पष्टीकरण नोंद केलेले नाही. ज्या लोकांनी लाच घेतली ते निश्चित प्रकारे भारतात आहेत कारण त्यांनी इटलीच्या कंपनीच्या बाजूने सौदा प्रभावित केला.

खुप आधी एफआयआरच्या मदतीने पोलिस चौकशी झाली असती, आरोपींना अटक करु शकत होतो, चौकशी झाली असती आणि दस्ताऐवज औपचारिक प्रकारे मागण्यात आले असते, तसेच काही दलालांनी प्रत्यार्पण केले असते. याची आवाजी मागणी होत असताना आतापर्यंत एकही एफआयआर नोंदवण्यात आली नाही आणि सरकारने यासंदर्भात कोणतेच आश्वासन दिले नाही. याकरिता युपीए सरकारचा

अचानक जेपीसी कडून चौकशी करण्याचे बोलून दाखवणे म्हणजे फक्त वेळकाढूपणाचे लक्षण आहे आणि ही घटना विसरवण्यासाठी हा प्रकार सुरु आहे. हे माहित आहे की जेपीसी कडे पोलिस चौकशी, अटक करण्याचा अधिकार नाही आहे. तसे पाहिले तर जेपीसी ची चौकशी तीन महिन्यात पूर्ण होत नाही. लवकरच लोकसभा शेवटच्या वर्षात प्रवेश करणार आहे, त्यामुळे सरकारचे इरादे संदेह निर्माण करतात. असे वाटते की सरकार आरोपींना वेळ देत आहे, जेणेकरुन ते पुरावे नष्ट करु शकतील. भाजप अशी मागणी करते की, जर लाच देणा-याचे नाव माहित आहे, जर हे माहित आहे की लाच कशाप्रकारे देऊ-घेऊ केली तर त्या सर्व लोकांच्या विरोधात त्वरित चौकशी, अटक, तपासणी झाली पाहिजे, आणि लाच घेणा-यांसह त्यांचा बचाव करणा-या सर्व संरक्षितांना शिक्षा केली पाहिजे ज्यांनी सौदा केला.

भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यासाठी एक प्रभावकारी लोकपालासारखी संस्था आणि एक स्वायत्त आणि जबाबदार म्हणून सीबीआय महत्त्वपूर्ण आहे आणि भाजपा त्याकरिता प्रतिबद्ध आहे.

<u>भारताच्या प्रतिष्ठेला तडा</u>

भारत सरकारच्या विश्वसनीयतेवर याआधी कधी प्रश्नं उठले नाही जसे आज उठत आहेत. घोटाळ्याच्या मालिकेमुळे आंतर्राष्ट्रीय स्तरावर देशाच्या प्रतिष्ठेला तडा पोहचला आहे, जे युपीए सरकारच्या बदनामीचे सर्वात मोठे कारण आहे. युपीए-II ने योग्य नीति बनावण्यात न आल्याने तसेच कुशासना मुळे भारताबाबत जगाचे मत सर्वांनाच माहित आहे. प्रशासनिक निर्णयाला सुधार उपायाची संज्ञा द्यायला निश्चित प्रकारे कोणता फरक पडणार नाही कारण आशेचा किरण दिसत नाही आणि भारताला एक महत्त्वपूर्ण वैश्विक ताकद बनण्याच्या स्वप्नावर गंभीर प्रश्नं निर्माण केले जात आहेत. हे सर्व काही तेव्हा होत आहे ज्यावेळेस या महान देशात अभूतपूर्व

संभावना आणि तिच्या जनतेची असीम प्रतिद्धता आहे, याठिकाणी आता उदासिनता आणि निराशा आहे.

<u>दहशतवादाचा खतरा भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने मोठे आव्हान</u>

हैद्राबाद मध्ये 21 फेब्रुवारी 2013 ला झालेल्या बॉंबस्फोटात 16 जण मारले गेले आणि 90 गंभीर रित्या जखमी झाले. दहशतवादाच्या वाईट चेह-याने पुन्हा एकदा आमच्या सुरक्षेला उद्धस्त केले. जुलै 2005 पासून आतापर्यंत देशाच्या विभिन्न भागात 25 मोठे दहशतवादी हल्ले झाले ज्यामध्ये सुमारे 500 निर्दोष भारतीय मारले गेले. स्वाभाविक आहे की यात जम्मू-काश्मीर मध्ये मारले गेलेले सुरक्षा दल आणि तो सरपंच शामिल नाही आहे, ज्यांना जनतेने लोकतांत्रिक पद्धतीने निवडले होते. दहशतवाद्यांनी देशाची राजकिय राजधानी नवी दिल्ली, आर्थिक राजधानी मुंबई, ज्ञानाची राजधानी बंगळुरु आणि हैद्राबाद, भारताचा धार्मिक केंद्र वाराणसी आणि भारताचे प्रचलित सांस्कृतिक आणि शिक्षा केंद्र पुणे यांव्यतिरिक्त अनेक शहरात आणि ग्रामीण भागाला आपले लक्ष्य केले. योजना बनवणा-या मुख्य अतिरेकी आणि घडवणा-यांचे पाकिस्तान हे सुरक्षित शरण स्थळ आहे कारण त्यांना तिथल्या शासनात असलेल्या लोकांचा आणि सशस्त्र दलाचा पाठिंबा आहे. पाकिस्तान मध्ये सरकारच्या समर्थनार्थ आणि सरकारच्या समर्थनाशिवाय दोन्ही बाजूने भुमिका निभावण्यात येते. हे सर्वांना माहित आहे की दहशतवादी संघटना लष्करे तैयब्बाला पाकिस्तानातील सत्तारुढ शासनाचा आश्रय मिळाला आहे. हैद्राबाद स्फोटतील प्रमुख संशयित इंडियन मुजाहिद्दीन हा गेल्या काही वर्षापासून देशातील सर्वात मोठी दहशतवादी संघटन बनली आहे. जिचा मूळ उद्देश फक्त बदला घेणे आणि गर्दीच्या ठिकाणी भयानक हल्ले करणे आहे. त्याच्या प्रमुख समर्थकांना देखील पाकिस्तानात आश्रय मिळाला आहे.

भाजपाचे दृढ मत आहे की, पाकिस्तानासोबतचे संबंध सामान्य बनवणे तोपर्यंत योग्य होणार नाही जोपर्यंत ते भारताविरुद्ध त्यांच्या जमिनीवरुन काम करणा-या दहशतवाद्यांविरोधात निर्णायक कारवाई करत नाही. पाकिस्तान जानेवारी 2004 मध्ये पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी आणि राष्ट्रपती मुशर्रफ यांच्यादरम्यान झालेल्या समझोत्या दरम्यान प्रतिबद्ध झाला होता, त्यानुसार कारवाई करत नाही. युपीए सरकार या समझोत्याला जवळपास विसरली आहे. तथापि मुंबईत झालेला 26/11 चा दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने पाकिस्तानविरोधात कडक भुमिका घेतली होती मात्र नंतर स्थिती कमजोर बनली. जुलै 2009 मध्ये शर्म अल शेख मध्ये स्थिती पलटली आणि मुंबईतील हल्ल्यातील दोषींच्या विरोधात कारवाईची मागणी फक्त एक औपचारिकता बनली.

युपीएने अधिकतर वेळ दहशतवादाला राजकीय रंग चढवण्यात घालवला. तर एनडीए सरकारने दहशतवाद विरोधातला कायदा बनवला, एवढच नाही तर सर्वोच्च न्यायालयाने याला कायम केले, मात्र कॉंग्रेस सरकारने याला अल्पसंख्याक विरोधी सांगून यास विरोध केला. निराशाजनक रेकॉर्ड असलेले विद्यमान गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी भगवा आणि हिंदू आतंकवाद बोलून दाखवून वाद निर्माण केला, ते कदाचित विसरले असतील की दहशतवादाचा कोणताच रंग किंवा धर्म नसतो, आणि भगवा आणि हिंदू परंपरा आमच्या सभ्यता आणि सांस्कृतिकतेचे प्रतिनिधीत्त्व करते. स्वाभाविक आहे, त्यांची टिप्पणी ऐकून पाकिस्तान मधील दहशतवाद्यांचे मन खुश झाले असेल. 26/11 च्या मुंबई हल्ल्याचा सूत्रधार हाफिज सईद ने सार्वजनिक रित्या या वक्तव्याचे स्वागत केले. यानंतरचे तथ्य हे आहे की, शिंदे यांनी या वक्तव्याबाबत खेद व्यक्त केला आहे की, त्यांचा उद्देश हा संघ किंवा भाजपाला दुःख पोचवण्याचे नव्हते, पाकिस्तान आणि तेथील दहशतवाद्यांना निराधार बोट ठेवण्यापासून कोणी

रोकू शकत नाही.

सर्वोच्च न्यायालयाकडून सात वर्षाआधी निर्णय दिल्यानंतर वोट बँकेसाठी अफजल गुरुला फाशी देण्यासाठी जाणून बुजून विलंब करण्यात आला. हे लक्षात घेता बदला घेण्याच्या दहशतवादी कृत्याला रोखण्याकरिता सरकारला त्वरित पावले उचलण्याची गरज होती. गृहमंत्री श्री शिंदे यांनी दहशतवादी हल्ला होण्याबाबतची माहिती सरकारकडे होती असे वक्तव्य केल्यानंतर सरकारची विफलता पुन्हा एकदा समोर आली. स्वाभाविक आहे सरकारला हे सांगणे गरजेचे आहे की माहिती मिळाली असून देखील सरकार वेळेवर कारवाई करण्यास निष्फळ का ठरली. दुर्दैवाने वोट बँकेच्या राजकारणासाठी दहशतवादाच्या राजकारणाने या देशाचा संकल्प आणि क्षमतेला दुर्बल केले. भाजपाचे म्हणणे आहे की, दहशतवादाला कधीच सहन करु नये आणि याबरोबर समझोता पण केला नाही पाहिजे कारण याबरोबर फक्त देशाची सुरक्षा आणि अखंडता जोडली गेली नाही तर प्रभुसत्ता पण जोडली गेली आहे. जर कठोर निर्णय घ्यावे लागले तर ते घेतले गेले पाहिजेत मग त्याचे कोणतेही परिणाम असोत.

दहशतवादाच्या विरोधातील संघर्षात क्षमता निर्माण होणे गरजेचे आहे. दहशतवादाचा सामना करणे हे केंद्र आणि राज्य सरकारांची एकत्रित जबाबदारी आहे. आपल्या संविधानिक व्यवस्थेत भारताचे रक्षण हे केंद्र सरकारची जबाबदारी आहे. कायदा-व्यवस्था आणि पोलिस राज्यांच्या अखत्यारित येतात. दहशतवादाच्या विरोधातली लढाई ही सांघिक रचनेनुसार लढली जाऊ शकते. सांघिक रचना विरोधात दहशतवादाच्या काल्पनिक मुद्द्याला घेऊन युक्तिवाद करणे निरर्थक असेल. राष्ट्रीय दहशतवाद विरोधक केंद्र बनवण्यासाठी सैंधांतिक दृष्ट्या कोणती आपत्ती नाही, मात्र याची शक्ती आणि अधिकार क्षेत्र हे संविधानिक रचनेच्या आत होणे गरजेचे आहे.

माओवाद आणि नक्षलवादाचा खतरा पहिल्यासारखा आजही गंभीर बनला आहे. शिक्षेपासून वाचण्यासाठी ते अधिकतर ग्रामीण भागात निर्दोष लोक आणि देशाच्या विभिन्न भागातील मोठ्या संख्येतील सुरक्षा जवानांची हत्या करत आहेत. ही एक राष्ट्रीय समस्या आहे पण याचा सामना कसा करावा याबाबत सरकारकडे दूरदर्शितेचा अभाव आहे.

भारतीय सैनिकांवर पाकिस्तानी सैनिकांचा निर्घुण हल्ला

जम्मू-काश्मीर सीमेवर पाकिस्तानी सेनेकडून दोन बहादूर भारतीय सैनिकांची नुकतीच अत्यंत अमानवीय आणि निर्घुण हत्या करण्यात आल्याने संपूर्ण देशात आक्रोश आहे. त्यांचे शिर धडापासून वेगळे करण्यात आले, ज्याला कोणत्याही प्रकारे सहन केले जाऊ शकत नाही आणि याची कडक शब्दात निंदा केली गेली पाहिजे. आपल्याला योग्य वेळेत योग्य जबाब देऊन बहादुर सशस्त्र सेनेच्या विवेकाचा सन्मान केला पाहिजे. स्वाभाविक आहे की अशी हरकत आणि भारताच्या विरोधात प्रायोजित दहशतवादाला पाहता पाकिस्तानबरोबर बातचीत करण्याआधी लक्ष्मण रेषा खेचणे गरजेचे आहे. सीमेवर प्रायोजित दहशतवादामुळे निर्दोष भारतीय मरत असतील तर सार्थक बातचीत करणे शक्य नाही.

महिलांच्या सुरक्षा भारताच्या राजकीय परिदृष्याच्या केंद्रात

राजधानी दिल्लीत एका बहादूर मुलीवर झालेला बलात्कार आणि हत्येने संपूर्ण देश स्तब्ध झाला. भारताच्या राजधानीत ही लज्जस्पद घटना घडली. या घटनेची कठोर शब्दात निंदा झाली पाहीजे. देशात ज्याप्रकारे रोष प्रकट करण्यात आला तो उचित होता. युवकांच्या शांतीपूर्ण निषेधाला दिल्ली पोलिस आणि प्रशासनाने ज्याप्रकारे सामना केला ते अत्यंत निंदनीय आहे. तरुण-तरुणींवर आणि पालकांवर अत्यंत निर्घुणपणे लाठीचार्ज करण्यात आला आणि कडक थंडीत त्यांच्यावर पाणी

फेकण्यात आले. महिलांच्या विरोधात अशाप्रकारच्या घटना सातत्याने घडत आहे. नुकतीच भंडा-यात (महाराष्ट्र) तीन निरागस मुलींवर बलात्कार आणि त्यांची निर्घ्रुण हत्या करण्यात आली आणि पोलिसांची या घटनेबद्दलची उदासिनता, भयंकर निंदनीय आहे. जर भारताला विकास करायचा असेल तर असे वातावरण बनवले पाहिेजे की, जिथे महिला स्वतःला पूर्णतः सुरक्षित समजतील आणि ही सामूहिक जबाबदारी आहे. भाजपा हे लक्ष साधण्यासाठी हर-प्रकारे कायदे आणि प्रशासनिक उपायांचे समर्थन करण्यास जबाबदार आहे. फक्त दिखावा करणा-या कारवाईने काम होणार नाही. याकरिता आवश्यक आहे प्राथमिकतेच्या आधारावर पोलिस, कायदा आणि न्याय व्यवस्थेच्या रचनेला आणखी मजबूत केले पाहिजे तरच दोषिंना शिक्षा मिळू शकेल.

## आसाममध्ये स्फोटक स्थिती

आसाम मधील स्थिती खुपच स्फोटक बनली आहे. तेथील अयोग्य कॉग्रेस सरकारची एकमात्र् चिंता वोट बँकेचे राजकारण आहे, ज्यामुळे आसामच्या विभिन्न भागात बेकायदेशीर रित्या वसलेले बांग्लादेशातील लाखो घूसखोरांना शरण देऊन आगीत घी टाकण्याचे काम केले आहे. अशा भयंकर स्थितीची आसाममधील आदिवासी वसाहत शिकार बनली आहे. हल्लीच गोलपाडा जिल्ल्यात 20 पेक्षा अधिक आदिवासी मारले गेले जे राभा हसोंग स्वायत्त परिषदेच्या ग्राम पंचायत निवडणुकांचा योग्य प्रकारे विरोध करत होते. गोगोई सरकारला अनधिकृत घूसखोरांच्या दबावाला बळी पडत ही निवडणुक करावी लागली. याआधी कोक्राझार जिल्ह्यात आणि त्याच्या आसपासच्या परिसरात झालेली सांप्रदायिक जातीय हिंसेक सुमारे 50 जण मारले गेले आणि 2 लाखाहून अधिक जण बेघर झाले. तेथील मूळ बोडो आणि बांग्लादेशातून बेकायदेशीर रित्या पलायन केलेल्या मुसलमानांमध्ये हिंसात्मक संघर्षाने तेथील जनसंख्येचे

स्वरुप बदलले आहे जे सीमेच्या अगदी जवळ आहेत. बोडो राहत असलेल्या परिसरात बेकायदेशीर राहत असलेल्या घूसखोरांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या. त्यामुळे आपल्याच जमिनीवर बोडोंचा अधिकार राहिला नाही. डॉ.मनमोहन सिंह जे 20 वर्षापासून अधिक काळ आसामच्या राज्यसभेचे सदस्य आहेत त्यांना या परिस्थितीची गंभीरता कळली पाहिजे, जी खरे तर एक राष्ट्रीय समस्या आहे. तरुण गोगोई हे आसामच्या आदिवासी जनतेचे रक्षण करण्यास पूर्णतः निष्फळ ठरले आहेत. बांग्लादेशी घूसखोरांचे हित हे कॉंग्रेस सरकारला आसाम व पूर्वोत्तर राज्यांतील आदिवासी आणि अन्य समाजापेक्षा अदिक महत्त्वपूर्ण आहेत.

रामसेतू सोबत कोणत्याही प्रकारची छेडछाड सहन करणार नाही

भाजपा सेतू समुद्रम परियोजनेच्या अंतर्गत रामसेतू ची कोणत्याही प्रकारे छेडछाडीचा विरोध करते. युपीए सरकारने नुकतेच पचौरी आयोगाचा रिपोर्ट अस्वीकार केला आहे, ज्यात गंभीर परिस्थिती आणि आर्थिक चिंता मांडण्यात आली आहे. परियोजनेकरिता सकारात्मक विचारांसोबत निश्चित प्रकारे वैकल्पिक मार्ग शोधला जाऊ शकेल. मात्र भारत सरकारच्या भूमिकेबद्दल संशय निर्माण होतो. युपीए सरकारने मर्यादा पुरुषोत्तम श्री राम यांच्या अस्तित्त्वाबद्दलच प्रश्नं निर्माण केले असून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि देशात यावरुन झालेला आक्रोश पाहता सरकारला ती याचिका मागे घ्यावी लागला. रामसेतूचे नुकसान किंवा त्याच्यासोबत छेडछाड कधीच सहन केली जाणार नाही. भगवान श्री राम भारताच्या संस्कृति, अध्यात्मिक आणि मानव सभ्यतेचे प्रतिक आहेत, ज्यांच्याशिवाय भारताची ओळख अपूर्ण आहे आणि रामसेतू शिवाय रामकथा अपूर्ण आहे. भाजपा रामसेतूला राष्ट्रीय महत्त्वाचे स्मारक घोषित करण्यासाठी तामिळनाडूतील अस्तित्वात सरकारच्या वतीने पुढाकार घेण्यात आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

गंगा-यमुना या फक्त नद्याच नाहीत तर भारतीय जीवनधारा आणि ठेवा आहेत. त्यांची सध्याची स्थिती चिंताजनक आहे. हा आपला राष्ट्रीय संकल्प असला पाहिजे की या दोन्ही नद्यांच्या सफाई आणि पवित्रतेला पुर्नस्थापित करुन त्यांचा प्रवाह वाहता केला पाहिजे.

<u>गुजरात मध्ये श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात भाजपाचा सातत्याने तिसरा विजय</u>

राष्ट्रीय परिषद, मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्य सक्षम नेतृत्त्वाखाली राज्यात भाजपाची सातत्याने तिसरा विजयामुळे गुजरातच्या जनतेला धन्यवाद देत आहे. त्यांच्या सुशासनामुळे राज्यात चौतर्फा विकास झाला आहे, ज्यामुळे जनतेचे समर्थन मिळाले आणि राज्यात

तिस-यांदा भाजपा विजयी झाली. कॉंग्रेस पक्ष कुठेच टक्कर देऊ शकली नाही. त्यांच्या वरिष्ठ नेत्यांना नामुष्की पत्करावी लागली.

आम्हाला विश्वास आहे की मध्यप्रदेश आणि छत्तीसगड येथील भाजपा सरकार आपल्या उल्लेखनीय कार्याने आणि मुख्यमंत्री श्री शिवराज सिंह चौहान आणि श्री रमण सिंह यांच्या लोकप्रिय नेतृत्त्वामुळे येणा-या निवडणुकीत तिस-यांदा जनतेचे समर्थन प्राप्त करतील.

आम्ही गुजरातेत विजयाची खुशी साजरा करत आहोत. मात्र हिमाचल प्रदेशातील हार मुळे आपल्याला आत्मपरिक्षण करायला पाहिजे आणि योग्य धडा शिकला पाहिजे. झारखंड प्रदेशात त्वरित विधानसभा निवडणुका केल्या गेल्या पाहिजेत तरच लोकांना आपली लोकप्रिय सरकार निवडण्याची संधी मिळेल. राष्ट्रपती शासनाच्या आड कॉंग्रेस सरकारचे अप्रत्यक्ष नियंत्रण योग्य नाही. नागालँड मध्ये नागा पीपल्स फ्रंट च्या सरकारची पुन्ही जीत झाल्याने आम्ही त्यांचे अभिनंदन करतो

ज्यांच्याबरोबर भाजपाची युती होती. आता वेळ आली आहे की, भारतीय संविधानाच्या अंतर्गत नागा समस्येच्या राजकीय समाधानासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

<u>भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी-भाजपाच्या नेतृत्त्वात एनडीए एकमात्र विकल्प</u>

देशाची जनता युपीए सरकारच्या भ्रष्टाचार, कुशासन, महागाई आणि निराशाजनक रेकॉर्ड मुळे खरं तर त्रस्त झाली आहे, ज्यामुळे सामान्य जनतेचे जगणे मुश्कील झाले आहे. मोठ्या आत्मीयतेने श्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्ववाली एनडीए सरकारला जनता आजही आठवण काढते, ज्या सरकारने विश्वास, उत्साह, भागीदारी, निरंतर वृद्धि, महागाईवर नियंत्रण मिळवताना सद्भावनेचा ठेवा पाठी सोडला आणि भारतासाठी एका मोठ्या देशाच्या स्वरुपात येण्याचा मार्ग प्रशस्त केला. याठिकाणी आता निराशा आणि उदासिनता आहे. युपीए ' असुरक्षित भारत आणि असहाय भारता' चा ठेवा पाठी सोडत आहे. भारतात भाजपाच्या नेतृत्त्ववाली एनडीए सरकार पुन्हा आणणे गरजेचे आहे. युपीए च्या शासनकाळात देशाचा विकासदर 5 टक्क्याहून कमी राहिला, अशा वेळी हा गर्वाचा विषय आहे की, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, बिहार आणि पंजाब यांसारखे अधिकतर भाजपा आणि एनडीए शासित राज्यांमध्ये विकास दर 10 टक्क्यांपेक्षा अधिक आहे. हे सुशासन आणि समानतेबरोबर विकासावर लक्ष केंद्रित करण्याच्या कारणास्तव शक्य झाले. आता वेळ आली आहे की, देश आता जागला पाहिजे, एनडीए चा विस्तार झाला पाहिजे आणि निवडणुक झाल्यास निर्णायक बदलाव होण्याची आशा जागृत होईल. भाजपा पूर्ण देशाला खास करुन युवा वर्गाला असे आश्वस्त करते की, ती भारताला तिच्या क्षमतेनुसार योग्य स्थान देईल. असा भारत, जो सुरक्षित असेल, आशावादी असेल, जिथे विकास सर्वव्यापी तसेच सर्वस्पर्शी असेल. कॉंग्रेसच्या नेतृत्वात युपीए

सरकारच्या कुशासनाविरोधात भाजपाच्या नेतृत्त्वाता एनडीए एकमात्र विकल्प आहे जी देशाला सुशासन आणि विकास प्रदान करील. राष्ट्रीय परिषद सर्व कार्यकर्त्यांना आवाहन करते की ते या महान उद्देशासाठी समर्पित होतील.